नाशिक
दि. २०/०८/२०१९

# प्रेसनोट

## आलोसे अनिल लक्ष्मण निकम, कनिष्ठ आरेखक, नगररचनाकार, विकास योजना विशेष घटक मालेगांव, जि.नाशिक यांना ८०,०००/–रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांची कारवाई.

| | |
|---|---|
| घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद कमांक | कार्यवाही चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | अनिल लक्ष्मण निकम, कनिष्ठ आरेखक, नगररचनाकार, विकास योजना विशेष घटक मालेगांव, जि.नाशिक |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | ८०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ८०,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी त्यांचे पत्नीच्या नांवे भारम, ता.येवला, जि.नाशिक येथील गट नं. १४९ मध्ये पेट्रोलपंपासाठी लागणारी जागा अकृषक करण्याकरीता नगररचना विभागाची नाहरकत परवानगी घेणेकरीता प्रकरण नगररचनाकार, विकास योजना विशेष घटक मालेगांव, जि.नाशिक कार्यालयात सादर केले आहे. दिनांक ०८/०८/२०१९ रोजी सदर प्रकरणाबाबत तक्रारदार यांनी आलोसे अनिल लक्ष्मण निकम, कनिष्ठ आरेखक यांची कार्यालयात भेट घेतली असता आलोसे निकम यांनी सदर प्रकरणाची फाईल पूर्ण करावयाची असेल तर कार्यालयातील इतरांना पैसे द्यावे लागतील असे म्हणून ८०,०००/–रुपये लाचेची मागणी तक्रारदार यांचेकडे केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने दिनांक १३/०८/२०१९ रोजी पडताळणी केली असता आलोसे अनिल लक्ष्मण निकम, कनिष्ठ आरेखक यांनी तक्रारदार यांचेकडे पंच साक्षीदारांसमक्ष ८०,०००/– रूपये लाचेची मागणी केल्याने आज दिनांक २०/०८/२०१९ रोजी त्यांचेविरुध्द सापळा आयोजीत केला असता आलोसे अनिल लक्ष्मण निकम, कनिष्ठ आरेखक, नगररचनाकार, विकास योजना विशेष घटक मालेगांव, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडून ८०,०००/– रूपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम नाशिक येथील पंचवटी कारंजा बसस्टॉपवर पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई–मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३–२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

२०.८.१९

( दिनकर पिंगळे )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो नाशिक परिक्षेत्र, नाशिक

Scanned by CamScanner